Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक १४३ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

उघड्यावर मांस विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई!

(पान २ वर)



» Selected

### प्रसिद्ध मराठी गायिकेवर गुन्हा दाखल

मुंबई : प्रसिद्ध मराठी लोकगायिका निशा भगत आणि अनिल आहिरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या उल्हासनगर सेंट्रल हॉस्पिटलमध्ये पतीला सरकारी नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत कल्याणमधील एका महिलेकडून 20 लाख रुपये घेतल्याचा आरोप या दोघांवर करण्यात आला आहे. कल्याण येथील सायली चव्हाण यांच्या तक्रारीनंतर विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला. या नोकरीसाठी पैसे घेण्याच्या या प्रकरणात सेंट्रल हॉस्पिटलमधील कोणत्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता का, याचाही पोलीस तपास करत आहेत.सायली चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार, त्यामुळे निशा भगत आणि अनिल आहिरे यांचे त्यांच्या घरी नेहमी येणे-जाणे होते. दोघेही त्यांच्या कुटुंबासोबत कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असल्याने त्यांची कुटुंबाशी जवळची ओळख निर्माण झाली.

## मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं वक्तव्य

# मराठा आरक्षणाच्या मागणीवर मार्ग काढणार!

## आंदोलनात सरकारचे प्रतिनिधी आहेत ते चर्चा करणार, मार्ग काढणार

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी जात पडताळणी समिती रद्द करण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी जरांगे अंतरवाली सराटीत उपोषणाला बसले आहेत. जरांगे यांच्या उपोषणाचा आज रविवारी दुसरा दिवस आहे.**



एकीकडे मनोज जरांगे यांनी एकनाथ शिंदे यांच्या परभणीतील कार्यक्रमाला दर्शवला आहे. अंतरवाली सराटीतून आक्रमक भूमिका घेतलेल्या मनोज जरांगे यांच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मागणीवर मार्ग काढणार असल्याचे फडणवीसांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'मला असं वाटतं की जे काही आंदोलन चालले आहे.

त्या आंदोलनात सरकारचे प्रतिनिधी त्या ठिकाणी आहेत. ते चर्चा करणार आहेत. यापूर्वीही आपण मार्ग काढला आहे. पुढेही आपण मार्ग काढणार आहोत. उपमुख्यमंत्री शिंदे हे सुरवातीपासून अतिशय संवेदनशीलतेने काम करत आहेत'. जात पडताळणी समिती रद्द करण्याच्या मागणीवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,' ज्या काही मागण्या कायदेशीर असतील, संविधानच्या अंतर्गत असतील आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचं उल्लंघन करणाऱ्या नसतील, अशा सगळ्या मागण्यांकरिता आम्ही चर्चेची दारे खुली ठेवली आहेत'.गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाची पाहणी केल्यानंतर फडणवीस म्हणाले, 'गोरेवाडा प्राणी उद्यान तयार केलं.

शहरापासून सहा किलो मीटर अंतरावर आहे. मागील 25 वर्षांपासून प्राणी उद्यान तयार करण्याठी प्रयत्न करत होतो. रेस्क्यू सेंटर सुरू केलं. त्यानंतर इंडियन सफारीची सुरुवात केली. पुढच्या वर्षी आफ्रिकन सफारी सुरू करण्याचा प्रयत्न आहे. यात देशातील सर्वात चांगलं रेस्क्यू सेंटर झालं आहे.

जेवढे डॉक्टर आहेत. जे महत्त्वाचे प्राणी आहेत, त्यांना त्यांच्यावर शिकण्यासाठी संधी मिळत नाही. ती संधी येथे मिळेल. मोठ्या प्रमाणात डॉक्टर येत आहेत. इतर काही स्टाफ येताहेत. त्यांचंही ट्रेनिंग होईल'.देशभरात येथून प्राणी चालले आहेत. मी फेरफटका मारला. बिबट्या, वाघ असे सर्व प्राणी पाहायला मिळाले. याचा पुढचा टप्पा कसा करायचा, याबाबत माझी वनमंत्री गणेश नाईक यांच्यासोबत बैठक आहे. इकडे चांगलं हॉटेल व्हावं, अशीही पुढची कार्यवाही आहे. आफ्रिकन सफारी आकर्षणांचं केंद्र ठरेल. बीग फाईव्ह या सफारीच्या माध्यमातून येतील. जगभरात ज्यांना पाहण्यासाठी जातात, ते येथे उपलब्ध होतील. शाळेचे मुलं येत आहेत. विदर्भासह मध्य प्रदेशातूनही विद्यार्थी येत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

### यापूर्वीही आपण मार्ग काढला आहे

एकीकडे मनोज जरांगे यांनी एकनाथ शिंदे यांच्या परभणीतील कार्यक्रमाला दर्शवला आहे. अंतरवाली सराटीतून आक्रमक भूमिका घेतलेल्या मनोज जरांगे यांच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मागणीवर मार्ग काढणार असल्याचे फडणवीसांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'मला असं वाटतं की जे काही आंदोलन चालले आहे. त्या आंदोलनात सरकारचे प्रतिनिधी त्या ठिकाणी आहेत. ते चर्चा करणार आहेत. यापूर्वीही आपण मार्ग काढला आहे.

# बाहेरून सरदार आले अन् मंत्री झाले, मी फक्त बघत बसलो!

## रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी सत्तेतील राजकीय समीकरणांवर भाष्य केले

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे| प्रतिनिधी:** मंत्रीपद न मिळाल्याची खदखद व्यक्त करत विधान परिषदेचे आमदार आणि रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी सत्तेतील राजकीय समीकरणांवर भाष्य केले आहे. रयत क्रांती संघटनेच्या ऊस आणि इथेनॉल परिषदेत बोलताना खोत यांनी नव्याने महायुतीत दाखल झालेल्या नेत्यांना मंत्रिपद दिल्यामुळे नाराजी व्यक्त केली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय प्रवासाचे कौतुक करत इथेनॉल मिश्रित पेट्रोलचेही समर्थन केले. सदाभाऊ खोत नेमकं काय म्हणाले ते जाणून घेऊयात. सदाभाऊ खोत यांनी, 'देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा माणूस तळागाळातून वर येतो आणि दीडशे आमदारांचा नेता होतो. आम्ही पण तुमचेच आहोत. पण वाड्यातले सरदार फडणवीसांच्या पायाला



जाऊन मिठी मारतात. पडळकर साहेब, हे सरदार आले आणि साहेबांच्या पायाला लागले. ते मंत्री झाले आणि आपण फक्त बघत बसलो. आपल्यावर काय वाईट वेळ आलीय', अशी खदखद खोत यांनी व्यक्त केली.त्याचवेळी सदाभाऊ खोत यांनी फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत 'आपला विस्थापित व्यक्ती राज्याचा मुख्यमंत्री झाला आणि प्रस्थापित त्याच्यासमोर लोटांगण घालू लागले, हा खरा आमचा विजय आहे, असेही म्हटले. यावेळी खोत यांनी सरकारकडे काही नेत्यांच्या कथित कारभाराची चौकशी करण्याची मागणी केली. 'मी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. हे गडी आत घ्या, यांना तेल लावून चांगलं मालिश करा. त्यांनी बँका, सूतगिरण्या, साखर कारखाने कसे खाल्ले याचा रिपोर्ट करा. या सर्व प्रस्थापितांनी गावगाडा उध्वस्त केला, असे खोत म्हणाले.बँकेच्या संचालकपदावरूनही त्यांनी टोला लगावला. 'आमदाराला बँकेत संचालक व्हावं वाटतं, कारण त्यांना माहिती आहे की बँक ही अलीबाबाची गुहा आहे. त्या गुहेत गेलं की पोतं घेऊनच बाहेर पडायचं, हे त्यांना माहिती आहे.' असे विधान खोत यांनी केलं. सदाभाऊ खोत यांनी यावेळी इथेनॉल मिश्रित पेट्रोलचे समर्थन करत विरोधकांवरही निशाणा साधला.

# 5 सप्टेंबरला दिल्लीत पुन्हा आंदोलन : दीपके

**जन सम्राट टाईम्स**

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी पाच तारखेला दिल्लीत आंदोलन करणार असल्याचीच माहिती दिली. विद्यार्थ्यांवर जे गुन्हे दाखल केले होते त्या मागण्या अजूनही मान्य झाल्या नाहीत. त्यामुळे आम्हाला नाइलाजाने आंदोलन करावं लागतंय असं दीपकेंनी म्हटलं.. सरकार म्हणत होतं की कोर्टामुळे आम्हाला ते करता येत नाही, पण कोर्ट म्हणतं आम्ही तयार आहोत तुम्ही फक्त लिस्ट द्या मात्र सरकार लिस्ट देत नाही देत नाही, असा दावा अभिजीत दीपके यांनी केला. जंतर-मंतरवर अगोदर जे आंदोलन झालं होतं त्यापेक्षा मोठा आंदोलन होणार आहे. आदिवासी मुलं आंदोलनाला बसली आहेत, देशातील असं एकही राज्य नाही की जिथे आंदोलन सुरू नाही, असंही दीपकेंनी म्हटलं. बॉम्बे हायकोर्टाची क्लार्क टायपिंग टेस्ट रद्द झाली आहे. परीक्षेवेळी की बोर्ड मध्ये प्रॉब्लेम होता अजून काही अडचणी होत्या.परीक्षा पुन्हा घेण्यात याव्यात अशी मागणी होती ती मागणी पूर्ण झाली आहे. यापुढे ज्या काही परीक्षा होतील ज्या सेंटरवर प्रॉब्लेम आले होते त्या सेंटरवर परीक्षा घेण्यात येऊ नये, असंही अभिजीत दीपके यांनी म्हटलं. सोनम वांगचुक यांच्या



वक्तव्यावर बोलताना अभिजीत दीपके म्हणाले, मला वाटतय तुम्ही तो पूर्ण व्हिडिओ पाहिला नाही, ते म्हणतात की मी जेवढे पाहिले आणि जेवढे राजकीय नेते पहिले त्यापेक्षा ही मुलं खूप चांगली आहेत. त्यांच्या बोलण्यामध्ये अजून तरी मला काही चुकीचं वाटलं नाही. पूर्ण व्हिडिओमध्ये तेच म्हटले आहेत हे मुलं खूप चांगले आहेत शिकलेली आहेत. तुम्ही तो व्हिडिओ पूर्ण बघावा ते खूप साऱ्या गोष्ट बोलल्या आहेत. सोनम वांगचुक यांनी अविश्वास कुठे दाखवला मला तर खूप छान वाटलं, राजकारणात सध्या अपराधी बसले आहेत त्यापेक्षा ही मुलं चांगली आहेत.मी का वाटून घेऊ त्या गोष्टीचं.असं दीपके म्हणाले. मनोज जरांगे पाटील काही चुकीचं मागत नाहीत, मराठा समाजाच्या मुलांसाठी शिक्षणाचा अधिकार मागत आहेत असे दीपके म्हणाले. रोजगाराचा अधिकार मागत आहेत. याची गरज यासाठी पडली आहे की सरकार त्या दोन गोष्टीवर पूर्णपणे अपेक्षित आहे. मी जरांगे पाटील यांनी नक्की भेटणार आहे. ते दिल्लीपर्यंत आले होते, मी इथपर्यंत जाऊ शकतो.

### प्रतिमा मलीन करणाऱ्या पोस्ट थांबवा

मुंबई : सोशल मीडियावर माझी प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केल्यास कायदेशार कारवाई केली जाईल, असा इशारा मोहित कंबोज यांनी दिला आहे. मोहित कंबोज हे राजकारणात सक्रिय असून महाराष्ट्रात तसेच देशातही ते सर्वपरिचित आहेत. त्यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यावर पोस्ट करून माझ्याविरोधात दिशाभूल करणारे आणि बनावट रिपोर्ट्स प्रसारित केले जात असल्याचा आरोप केला आहे.अन्यथा दिवाणी आणि फौजदारी मानहानीच्या कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.मोहित कंबोज यांनी बदनामीकारक पोस्ट, फोटो अपलोड करणाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिलाय.

# जर्मनीने चौथ्यांदा पटकावला हॉकी विश्वचषक!

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली| प्रतिनिधी:** बचाव फळीच्या अभेद्य तटबंदीच्या जोरावर गतविजेत्या जर्मनीने रविवारी रंगलेल्या आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्पेनवर १-० अशा निसटत्या फरकाने मात केली आणि या दिमाखदार विजयासह चौथ्यांदा विश्वचषक उंचावला. यासह त्यांनी सर्वाधिक चार विश्वविजेतेपदे जिंकणाऱ्या पाकिस्तानच्या ऐतिहासिक जागतिक विक्रमाशी बरोबरी साधली आहे. आता जागतिक हॉकीच्या इतिहासात जर्मनी आणि पाकिस्तान हे संयुक्तपणे सर्वात यशस्वी संघ ठरले आहेत. अंतिम फेरीत स्पेनने



सुरुवातीपासूनच आक्रमक चढाया करत जर्मनीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला; मात्र जर्मनीच्या शिस्तबद्ध बचाव फळीने आणि मध्यरक्षकांनी स्पेनचे सर्व प्रयत्न हाणून पाडले. सामन्यातील निर्णायक ठरलेला एकमेव गोल जर्मनीने अत्यंत कुशलतेने नोंदवला आणि त्यानंतर शेवटच्या क्षणापर्यंत भक्कम बचाव करत ही १-० अशी आघाडी टिकवून ठेवली.युरोपातील हॉकीची महासत्ता मानल्या जाणाऱ्या जर्मनीने यापूर्वी तीन वेळा विश्वचषक जिंकला होता. या विजयामुळे त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यापूर्वी त्यांनी २००२ (क्वालालंपूर, मलेशिया), २००६ (मोन्शेनग्लाडबाख, जर्मनी), २०२३ (भुवनेश्वर, भारत) या स्पर्धांमध्ये जेतेपदावर शिक्कामोर्तब केले होते.दुसऱ्या बाजूला स्पेनचा संघ तब्बल २८ वर्षांनंतर म्हणजेच १९९८ नंतर प्रथमच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. स्पेनची ही एकंदरीत तिसरी अंतिम फेरी होती.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# 'एक देश, एक निवडणूक'ला न्यायमूर्ती, वकील आणि अर्थतज्ज्ञांचा पाठिंबा

## वकील आणि अर्थतज्ज्ञांनी एकत्रित निवडणुकांच्या विविध पैलूंवर मते मांडली

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाचवेळी घेण्याच्या 'एक देश, एक निवडणूक' या प्रस्तावाला मुंबईतील राऊंड टेबल परिषदेत व्यापक समर्थन मिळालं. ज्युरिस्ट्स फॉर जस्टिस फाउंडेशनच्या वतीने आयोजित या परिषदेत माजी न्यायमूर्ती, ज्येष्ठ वकील, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ तसेच विविध क्षेत्रांतील सुमारे ५० मान्यवर सहभागी झाले होते. परिषदेत एकत्रित निवडणुकांचे घटनात्मक, प्रशासकीय, न्यायालयीन आणि आर्थिक परिणाम यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर 'एक देश, एक निवडणूक'च्या



समर्थनार्थ ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.माजी न्यायमूर्ती बी. पी. देशपांडे यांनी एकत्रित निवडणुकांच्या घटनात्मक पैलूंवर प्रकाश टाकला. माजी जिल्हा न्यायाधीश श्रीमती. मीराताई खडक्कर, यांनी 'एक देश, एक निवडणूक'ला आपला पाठिंबा व्यक्त केला. ज्येष्ठ अधिवक्ता अनिल सिंह, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी अंमलबजावणीच्या व्यावहारिक पैलूंवर प्रकाश टाकत एकत्रित निवडणुकांचे समर्थन केले.

अविनाश धर्माधिकारी, माजी सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) यांनी वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे पोलीस यंत्रणेवर येणाऱ्या अतिरिक्त ताणाचा आढावा घेतला आणि 'एक देश, एक निवडणूक'मुळे हा ताण कमी होण्यास मदत होऊ शकते, असे स्पष्ट केले.श्री. रवी पानी, चार्टर्ड अकाउंटंट यांनी 'एक देश, एक निवडणूक'चे आर्थिक आणि वित्तीय फायदे मांडले. प्रा. अधिवक्ता दीपक परमार, बौद्धिक संपदा हक्क (IPR) विषयातील तज्ज्ञ यांनी 'एक देश, एक निवडणूक'चे व्यापक फायदे स्पष्ट करताना त्याचा IPR क्षेत्राशी असलेला संबंध अधोरेखित केला.

श्री. नागेश व्ही. न्हवकर, माजी प्रधान जिल्हा न्यायाधीश तथा महाराष्ट्र राज्य विशेष सार्वजनिक सुरक्षा सल्लागार मंडळाचे विद्यमान सदस्य यांनी 'एक देश, एक निवडणूक' स्वीकारण्याच्या घटनात्मक पैलूंवर सविस्तर विवेचन केले. श्रीमती चंदा नथानी, माजी जिल्हा न्यायाधीश यांनीही या प्रस्तावाला आपला पाठिंबा व्यक्त केला.

माजी सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश धर्माधिकारी यांनी वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे पोलीस यंत्रणेवर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त ताणाचा मुद्दा उपस्थित केला. एकत्रित निवडणुकांमुळे हा ताण कमी होऊ शकतो, असं त्यांनी सांगितलं.चार्टर्ड अकाउंटंट रवी पानी यांनी एकत्रित निवडणुकांमुळे होणाऱ्या संभाव्य आर्थिक आणि वित्तीय फायद्यांचा आढावा घेतला. प्रा. अधिवक्ता दीपक परमार यांनी या प्रस्तावाचे व्यापक परिणाम आणि बौद्धिक संपदा हक्क क्षेत्राशी संबंधित पैलूंवर प्रकाश टाकला. माजी जिल्हा न्यायाधीश मीराताई खडक्कर आणि चंदा नथानी यांनीही 'एक देश, एक निवडणूक'ला पाठिंबा दर्शवला.




# दीप्ती-नंदनीच्या गोलंदाजीने थायलंड हादरलं!

## शेफालीची बॅट गरजली; आशिया कपमध्ये भारताचा थरारक श्रीगणेशा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** महिला आशिया कप 2026 मध्ये भारतीय महिला संघाने दणदणीत विजयासह आपल्या मोहिमेला सुरुवात केली आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या टीम इंडियाने पहिल्याच सामन्यात थायलंड महिला संघाचा तब्बल 94 धावांनी पराभव केला. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारताने 20 षटकांत 9 गडी गमावून 159 धावा उभारल्या. प्रत्युत्तरात थायलंडचा संपूर्ण संघ अवघ्या 65 धावांवर गारद झाला. भारताच्या विजयात फलंदाजीत शेफाली वर्माने तुफानी अर्धशतक झळकावत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर गोलंदाजीत दीप्ती शर्मा आणि नंदनी शर्मा यांनी प्रत्येकी तीन विकेट घेत थायलंडच्या फलंदाजीची कंबर मोडली.या सामन्यात थायलंडची कर्णधार नारुएमोल चाईवाई हिने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हरमनप्रीत कौरच्या टीम इंडियाला प्रथम फलंदाजी करावी लागली. भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संघाला नियमित अंतराने धक्के बसत राहिले. तरीही शेफाली वर्माच्या आक्रमक खेळीच्या जोरावर भारताने 20 षटकांत 9 विकेट्सच्या मोबदल्यात 159 धावा उभारल्या. भारताच्या डावात सर्वाधिक चर्चा शेफाली वर्माच्या फलंदाजीची झाली. शेफालीने अवघ्या 26 चेंडूंमध्ये चौकार आणि षटकारांची आतषबाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतरही तिचा आक्रमक अंदाज कायम राहिला. अखेर ती 36 चेंडूंमध्ये 8 चौकार आणि 3 षटकारांच्या मदतीने 64 धावा करून बाद झाली. तिचा स्ट्राइक रेट तब्बल 177.77 इतका राहिला. शेफालीच्या या खेळीमुळे भारताला मोठी धावसंख्या उभारण्याचा मजबूत पाया



मिळाला. दुसरीकडे स्मृती मानधनाने सुरुवातीपासूनच आक्रमक फटके खेळत 10 चेंडूंमध्ये 4 चौकारांच्या मदतीने 19 धावा केल्या. मात्र, धाव घेताना ती धावबाद झाली आणि भारताला पहिला धक्का बसला. यानंतर प्रतिका रावलने 18 चेंडूंमध्ये 2 चौकार आणि 1 षटकारासह 22 धावा केल्या. तिला सुलीपोर्न लाओमीने बाद केले. कर्णधार हरमनप्रीत कौरलाही मोठी खेळी करता आली नाही. ती अवघ्या 5 धावांवर लाओमीची शिकार ठरली. भारताची यष्टीरक्षक फलंदाज ऋचा घोष या सामन्यात विशेष योगदान देऊ शकली नाही. ती खातेही न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतली. यानंतर भारतीय फलंदाजांनी छोट्या-छोट्या योगदानाच्या माध्यमातून संघाची धावसंख्या वाढवली. भारतीय फूलमालीने 20 धावा, तर क्रांती गौडने 15 धावांचे योगदान दिले. दीप्ती शर्माने आपल्या 150व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात 5 धावा केल्या.भारताने दिलेल्या 160 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या थायलंडच्या फलंदाजांना भारतीय गोलंदाजांसमोर अजिबात टिकाव धरता आला नाही. भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत थायलंडच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. अवघ्या 16.1 षटकांत थायलंडचा संपूर्ण संघ 65 धावांवर ऑलआऊट झाला. थायलंडकडून नन्नापत कोंचारोएनकाईने 41 धावांची झुंजार खेळी केली. मात्र, तिच्याशिवाय एकाही फलंदाजाला 6 धावांचा टप्पा पार करता आला नाही. त्यामुळे भारताने तब्बल 94 धावांनी दणदणीत विजय मिळवला. भारताच्या विजयात गोलंदाजांनी निर्णायक भूमिका बजावली. दीप्ती शर्माने 3 विकेट्स घेतल्या, तर नंदनी शर्मानेही 3 फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यांच्यासोबत श्री चरणीने 2 विकेट्स, तर क्रांती गौडने 1 विकेट घेत थायलंडचा डाव गुंडाळला.महिला आशिया कप 2026 मध्ये भारतीय महिला संघाने दणदणीत विजयासह आपल्या मोहिमेला सुरुवात केली आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या टीम इंडियाने पहिल्याच सामन्यात थायलंड महिला संघाचा तब्बल 94 धावांनी पराभव केला. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारताने 20 षटकांत 9 गडी गमावून 159 धावा उभारल्या. प्रत्युत्तरात थायलंडचा संपूर्ण संघ अवघ्या 65 धावांवर गारद झाला. भारताच्या विजयात फलंदाजीत शेफाली वर्माने तुफानी अर्धशतक झळकावत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर गोलंदाजीत दीप्ती शर्मा आणि नंदनी शर्मा यांनी प्रत्येकी तीन विकेट घेत थायलंडच्या फलंदाजीची कंबर मोडली.या सामन्यात थायलंडची कर्णधार नारुएमोल चाईवाई हिने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हरमनप्रीत कौरच्या टीम इंडियाला प्रथम फलंदाजी करावी लागली. भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी करण्याचा प्रयत्न केला.

# संस्थापकत्त्व म्हणजे पक्षावर कायमची मालकी नव्हे

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी** राज्याच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र (NCP Merger) येणार या चर्चेला पुन्हा एकादा पेव फुटला आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देत खासदार सुप्रिया सुळे यांनी पक्षाची अधिकृत भूमिका मांडताना शरद पवार यांच्यावर झालेल्या अन्यायावर बोट ठेवले असून पक्षाचे संविधान आणि सध्याच्या न्यायालयीन लढाईवर थेट भाष्य केले आहे. "राष्ट्रवादी एकत्रच आहे, आमचा पक्ष एकत्रच आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एकच पक्ष आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली तेव्हा फाउंडर मेंबर आणि फाउंडर प्रेसिडेंट यांचं नाव शरद पवार आहे. पण चुकीच्या पद्धतीने तो पक्ष त्यांच्याकडून काढून घेण्यात आला. असं मोठं वक्तव्य सुप्रिया सुळेंनी केलंय.

तर शरद पवारांवर अन्याय झाला आहे आणि ती लढाई सध्या सुप्रीम कोर्टात सुरू असल्याचं ही त्यांनी पुढे नमूद केलं. एकंदरीत सुप्रिया सुळेंच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून प्रतिक्रया आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी सुप्रिया सुळे यांना उद्देशून एक पोस्ट लिहली. मात्र काही तासांतच ही पोस्ट डिलीट करण्यात आली आहे. सध्या या पोस्टाची आणि ती डिलीट केल्याच्या प्रकारामुळे उलट सुलट चर्चा आता रंगू लागली आहे.सुप्रिया ताई म्हणतात, 'राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार साहेबांनी स्थापन केली, त्यामुळे पक्ष त्यांचाच.' शरद पवार साहेब राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक आहेत, हे ऐतिहासिक सत्य आहे आणि त्यांच्या योगदानाचा आम्हाला आदर आहे. पण "संस्थापक" असणे आणि "पक्षाचा तहहयात मालक" असणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. राजकीय पक्ष म्हणजे घर, जमीन, कंपनीतील shareholding किंवा वारसाहक्काने मिळणारी खासगी मालमत्ता नाही. तो पक्षाची घटना, सदस्य, संघटनात्मक रचना आणि कायदेशीर प्रक्रियेनुसार चालणारी संस्था आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# वाघोड जिल्हा परिषद शाळेत 'स्वच्छ शाळा–सुंदर शाळा' अभियान उत्साहात!

## शाळा व्यवस्थापन समिती व कर्मचाऱ्यांचे श्रमदान



जन सम्राट टाईम्स

**रावेर | प्रतिनिधी :** शासनाच्या निर्देशानुसार रावेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, वाघोड येथे 'एक दिवस शाळा स्वच्छतेसाठी' या उपक्रमांतर्गत 'स्वच्छ शाळा–सुंदर शाळा' अभियान उत्साहपूर्ण वातावरणात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत शाळेची इमारत, वर्गखोल्या तसेच संपूर्ण शाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता अभियानाला प्रशासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. केंद्रप्रमुख श्रीमती प्रतिभाताई बडगुजर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. संतोष चौधरी, पत्रकार श्री. दिलीप महाजन, कुंवारस्वामी फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. प्रमोद चौधरी व संस्थेचे सदस्य तसेच डॉ. श्री. दीपक सोलंकी यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामस्थांचे श्रमदान; शाळा परिसर चकाचक अभियानात शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी श्री. निलेश महाजन आणि स्वच्छता कर्मचारी श्री. युवराज सरपटे यांनी सक्रिय सहभाग घेतला. गावातील विविध घटकांनी एकत्र येत स्वच्छता मोहिमेत श्रमदान केल्याने अभियानाला सामाजिक एकजुटीचे आणि प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले. शाळेच्या परिसरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि परिसर सुशोभीकरणावर विशेष भर देण्यात आला. 'स्वच्छ शाळा–सुंदर शाळे'मुळे सकारात्मक वातावरण स्वच्छता अभियानामुळे शाळेचा चेहरामोहरा बदलला असून विद्यार्थ्यांसाठी अधिक स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न वातावरण निर्माण झाले आहे. शाळेच्या स्वच्छतेसाठी ग्रामस्थांनी घेतलेल्या पुढाकाराचे परिसरात कौतुक होत आहे. शाळा ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजविणारे महत्त्वाचे केंद्र आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांमध्येही स्वच्छतेबाबत जनजागृती होण्यास मदत झाली. शासनाच्या निर्देशानुसार रावेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, वाघोड येथे 'एक दिवस शाळा स्वच्छतेसाठी' या उपक्रमांतर्गत 'स्वच्छ शाळा–वातावरणात राबविण्यात आले. या अभियानांतर्गत शाळेची इमारत, वर्गखोल्या तसेच संपूर्ण शाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली.

# बुलडाणा जिल्ह्यात गुन्हेगारीचा धडाका! चोरी, दरोडे, घटनांनी ग्रामीण भागात भीती

## आपलं गाव, आपली जबाबदारी' म्हणत तरुणांचा रात्रीचा पहारा

जन सम्राट टाईम्स



**मलकापूर । प्रतिनिधी:** बुलडाणा जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत चोरी, दरोडे, हल्ले आणि इतर गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमुळे ग्रामीण भागातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरांबरोबरच आता ग्रामीण भागातही गुन्हेगारीच्या घटना समोर येत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या अंधाराचा तसेच शेतातील उंच पिकांचा फायदा घेत चोरटे पसार होत असल्याने पोलिसांसमोरही मोठे आव्हान निर्माण झाले आहे. नांदुरा तालुक्यातील काटी येथे दरोड्यादरम्यान एका व्यक्तीचा खून झाल्याच्या घटनेने परिसर हादरला. माखनेर येथे महिलेवर हल्ल्याची घटना घडली, तर खुमगाव-बुट्टी परिसरात ग्रामस्थांनी संशयितांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना समोर आली. मलकापूर परिसरातही संशयित चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने नागरिकांमध्ये अधिक सतर्कता निर्माण झाली आहे. धारदार शस्त्राचा धाक; मलकापूर तालुक्यात खळबळ मलकापूर तालुक्यात उदरनिर्वाहासाठी आलेल्या एका महिलेवर दोन इसमांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवून अत्याचार केल्याची धक्कादायक घटना यापूर्वी समोर आली होती. या घटनेने ग्रामीण भागात खळबळ उडाली होती. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही संशयित आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. अफवांमुळे संभ्रम; संशयाच्या आधारावर मारहाणीचे प्रकार चिंताजनक गुन्हेगारीच्या घटनांबरोबरच चोरट्यांबाबतच्या अफवा वेगाने पसरत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी संशयाच्या आधारावर फेरीवाल्यांना मारहाण करण्याचे प्रकारही घडल्याने परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. संशयित व्यक्ती आढळल्यास कायदा हातात न घेता तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येणे गरजेचे आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगावी, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे. पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी ग्रामीण भागातील वाढती असुरक्षितता लक्षात घेता पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, संवेदनशील गावांमध्ये नियमित पेट्रोलिंग करावे आणि गावोगावी जनजागृती शिबिरे घेऊन नागरिकांना सुरक्षा उपायांबाबत मार्गदर्शन करावे.

# रावेरमध्ये उघड्यावर मांस विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई!

## सावदा रोडवरील 'सुपर मटन सेंटर'वर छापा

जन सम्राट टाईम्स



**रावेर |प्रतिनिधी :** सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर रावेर शहरात पोलिसांनी गस्त वाढविली असताना उघड्यावर तसेच अस्वच्छ वातावरणात मांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. रविवारी, दि. ३० ऑगस्ट रोजी सावदा रोडवरील 'सुपर मटन सेंटर' येथे उघड्यावर मांस विक्री होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी दुकान मालकांसह दोघांविरुद्ध रावेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रावेर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक हरिदास बोचरे, गोपनीय शाखा व गुन्हे शोध पथक शहरात पेट्रोलिंग करीत असताना सुपर मटन सेंटर येथे लोकांना सहज दिसेल अशा पद्धतीने बोकडाचे मांस विक्री होत असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी दुकानाची पाहणी केली असता दुकानात तीन बोकडांचे मांसाचे सांगाडे लटकविलेल्या अवस्थेत असल्याचे तसेच परिसरात कत्तल केलेल्या बोकडांचे रक्त पडलेले असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांच्या प्रेस नोटनुसार, मांसावर मोठ्या प्रमाणात माश्या बसलेल्या होत्या तसेच रक्त व मांसाच्या तुकड्यांमधून दुर्गंधी येत होती. या अस्वच्छतेमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. दोघांविरुद्ध गुन्हा दाखल या प्रकरणी गोपनीय शाखेचे अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल हिरालाल गुमळकर यांच्या फिर्यादीवरून शेख इरफान शेख खलिल आणि शेख फिरोज शेख खलिल (रा. मदीना कॉलनी, रावेर) यांच्याविरुद्ध रावेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०७/२०२६ असून भारतीय न्याय संहितेच्या कलम २७१ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम १०५ व ११७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई सुरूच राहणार उघड्यावर व अस्वच्छ पद्धतीने मांस विक्री करणाऱ्यांना यापूर्वीही वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, नियमांचे उल्लंघन सुरू राहिल्यास संबंधितांवर यापुढेही कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक संदीप गावीत, फैजपूर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अनिल बडगुजर तसेच रावेर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक हरिदास बोचरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# धानोरेश्वर महादेव मंदिरातील शिवलिंगाचा जीर्णोद्धार

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी:** जळगाव तालुक्यातील धानोरा येथे ग्रामस्थांच्या श्रद्धेचे स्थान असलेल्या श्री धानोरेश्वर महादेव मंदिरातील शिवलिंगाचा जीर्णोद्धार व विशेष अभिषेक पूजन सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण धानोरा गावात दिवसभर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने जुन्या संस्कृती व परंपरेला उजाळा देत आकर्षक पद्धतीने सजवलेल्या बैलगाडीतून शिवलिंगाची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषा आणि भक्तिमय वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीत ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पाच जोडप्यांचा अभिषेक पूजनात सहभाग या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री. सुधाकर खुशाल पाटील, निंबा गोविंदा पाटील आणि हितेश निंबा पाटील यांनी केले होते. विशेष अभिषेक व पूजनाच्या विधीमध्ये पाच जोडप्यांनी सहभाग घेतला. यावेळी ईश्वर भगवान पाटील, शैलेश निंबा पाटील, सागर ज्ञानेश्वर धनगर आणि दिलीप धोंडू पाटील यांच्या हस्ते मुख्य पूजा विधी पार पडला. मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींमुळे मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. आबालवृद्धांसह महिलांची मोठी उपस्थिती शिवलिंगाच्या जीर्णोद्धार सोहळ्यासाठी धानोरा गावातील आबालवृद्धांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. भाविकांनी महादेवाचे दर्शन घेतल्यानंतर महाप्रसादाचा लाभ घेतला.

# राजवाडे संशोधन मंडळाकडून शरद पवारांचा कृतज्ञता सोहळा!

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळ्यातील इतिहासकार वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या शतकपूर्तीच्या निमित्ताने मंडळाच्या उभारणीसाठी मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ नेते तथा खासदार शरद पवार यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शरद पवार यांनी राजवाडे संशोधन मंडळाच्या ऐतिहासिक वारशाचे आणि गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या संशोधन कार्याचे कौतुक केले. यावेळी महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, वैज्ञानिक व औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. राजवाडे संशोधन मंडळाला शतकपूर्ती होत असल्याने मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कृतज्ञता सोहळ्यात शरद पवार यांचा जंगी सत्कार करण्यात आला. त्यांच्या उपस्थितीत मंडळाकडे जतन असलेल्या अनेक दुर्मिळ ऐतिहासिक वस्तूंचे हस्तांतरणही करण्यात आले. या वस्तूंमुळे महाराष्ट्राच्या इतिहासाचा मौल्यवान ठेवा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्याच्या मंडळाच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. राजवाडे मंडळाच्या कार्याचे पवारांकडून कौतुक कार्यक्रमात शरद पवार यांनी राजवाडे संशोधन मंडळाने अनेक दशकांपासून जपलेल्या ऐतिहासिक वास्तू, वस्तू आणि दस्तऐवजांच्या माध्यमातून केलेल्या कार्याचे कौतुक केले. इतिहास, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी अशा संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या सोहळ्यात महाराष्ट्राच्या राजकारणातील दिग्गज नेत्यांसह शास्त्रज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनीही उपस्थिती लावत मंडळाच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. मान्यवरांनी राजवाडे संशोधन मंडळाशी संबंधित जुन्या आठवणींना उजाळा देत ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या कार्याचे कौतुक केले. शतकपूर्तीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला हा कृतज्ञता सोहळा राजवाडे संशोधन मंडळाच्या ऐतिहासिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला. इतिहासाचा ठेवा जतन करण्याबरोबरच नव्या पिढीपर्यंत तो पोहोचविण्याच्या मंडळाच्या कार्याला या सोहळ्यामुळे नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. राजकीय, वैज्ञानिक व सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती या प्रसंगी खासदार शरद पवार, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा अनुशास्त्रज्ञ अनिल काकोडकर, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, हर्षवर्धन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, धुळ्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, खासदार डॉ. अमोल कोल्हे, खासदार डॉ. शोभा बच्छाव, माजी मंत्री तथा माजी खासदार डॉ. सुभाष भामरे, कार्यक्रमाचे आयोजक संजय मुंदडा, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# अकोल्यातील शेतकऱ्यांना दोन कोटींची मदत

## मदतीच्या रकमेतून कर्जवसुली नको, शासनाचे बँकांना स्पष्ट आदेश

जन सम्राट टाईम्स

**अकोला । प्रतिनिधी :** यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील ६५ गावांमधील १ हजार ८४३ शेतकऱ्यांच्या १ हजार ३८.१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. कृषी, महसूल आणि ग्रामविकास विभागाने केलेल्या संयुक्त पंचनाम्यानंतर जिल्हा प्रशासनाने ७ ऑगस्ट रोजी २ कोटी ११ लाख १७ हजार रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर केला होता. या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी मिळाली असून, कापूस, सोयाबीन, तूर या शेतीपिकांसह संत्री, केळी आणि पपई या फळपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतीपिकांच्या नुकसानीपोटी तेल्हारा तालुक्यातील २४० शेतकऱ्यांच्या १६० हेक्टर क्षेत्रावरील कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांसाठी १३ लाख ६ हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. फळपिकांच्या नुकसानीमध्ये अकोट तालुक्यातील २५ गावांतील ३५९ शेतकऱ्यांच्या संत्रा आणि केळी पिकांचे नुकसान झाले आहे. तेल्हारा तालुक्यातील २२ गावांतील १ हजार १४६ शेतकऱ्यांच्या ५०७.८५ हेक्टर केळी आणि ५४.५



हेक्टर पपई पिकांचे नुकसान झाले. याशिवाय, बाळापूर तालुक्यातील २ गावांतील सात शेतकऱ्यांचे ४.७५ हेक्टर, पातूर तालुक्यातील सात गावांतील ८८ शेतकऱ्यांचे ५१.३३ हेक्टर आणि बार्शीटाकळी तालुक्यातील एका गावातील तीन शेतकऱ्यांचे १.२ हेक्टर केळी पिकाचे नुकसान झाले आहे. या सर्व फळपिकांच्या नुकसानीपोटी १ कोटी ९७ लाख ५७ हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे. मंजूर मदत मिळण्यासाठी संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सेतू केंद्रावर जाऊन बायोमेट्रिक (अंगठ्याचा ठसा) किंवा आधार क्रमांकाशी लिंक असलेल्या मोबाईलवर प्राप्त होणाऱ्या ओटीपीद्वारे प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर मदतीची रक्कम डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारा मदतीचा निधी बँकांनी कोणत्याही जुन्या कर्ज खात्यात किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी वसुलीसाठी वळता करू नये, असे शासनाने स्पष्ट आदेश दिले आहेत. मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्यानंतर त्यातून कर्जवसुली करू नये, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित बँकांना तातडीने आवश्यक सूचना द्याव्यात, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील ६५ गावांमधील १ हजार ८४३ शेतकऱ्यांच्या १ हजार ३८.१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. कृषी, महसूल आणि ग्रामविकास विभागाने केलेल्या संयुक्त पंचनाम्यानंतर जिल्हा प्रशासनाने ७ ऑगस्ट रोजी २ कोटी ११ लाख १७ हजार रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर केला होता. या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी मिळाली असून, कापूस, सोयाबीन, तूर या शेतीपिकांसह संत्री, केळी आणि पपई या फळपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतीपिकांच्या नुकसानीपोटी तेल्हारा तालुक्यातील २४० शेतकऱ्यांच्या १६० हेक्टर क्षेत्रावरील कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांसाठी १३ लाख ६ हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# पारोळा शेतकरी सहकारी संघाच्या विकासाला नवी झेप!

## १५० हून अधिक व्यापारी संकुलांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे आ. अमोलदादा पाटील यांच्या हस्ते भव्य भूमिपूजन

जन सम्राट टाईम्स



**पारोळा । प्रतिनिधी:** पारोळा तालुका शेतकरी सहकारी संघाच्या प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुलाच्या महत्त्वाकांक्षी बांधकामाचा भव्य भूमिपूजन सोहळा लोकप्रिय आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडला. शेतकरी बांधवांना आधुनिक व सक्षम सुविधा उपलब्ध करून देतानाच पारोळा शहराच्या विकासाला नवी दिशा देणारा हा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून साकारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात तीन मजली अत्याधुनिक इमारत, शेतकरी सहकारी संघाची प्रशासकीय कार्यालये, १५० हून अधिक व्यापारी संकुले, शेतकरी निवास आणि विविध अत्याधुनिक सोयी-सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांसाठी हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार असून, पारोळा शहराच्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात या माध्यमातून होणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. १०८ संस्था आणि ७ हजारांहून अधिक व्यक्ती सभासद सन १९१६ मध्ये स्थापन झालेल्या पारोळा तालुका शेतकरी सहकारी संघाला मोठी ऐतिहासिक व गौरवशाली परंपरा लाभली आहे. संघाचे पहिले अध्यक्ष स्व. आण्णासाहेब केशवराव चंदारकर पाटील, तर पहिले उपाध्यक्ष स्व. दादासाहेब बळवंतराव दौलतराव पाटील होते. सहकारमहर्षी माजी आमदार मा. आबासाहेब चिमणरावजी पाटील यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली संघाने शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवून विविध उपक्रम राबविले. सन १९८६-८७ पासून आजतागायत सभासद, संस्था प्रतिनिधी, शेतकरी बांधव तसेच माता-भगिनी यांनी सातत्याने विश्वास दाखवत संघाची सत्ता एकहाती शिवसेनेच्या ताब्यात दिल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. ज्वारी खरेदीत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक सहकारमहर्षी मा. आबासाहेब चिमणरावजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारोळा शेतकरी सहकारी संघाने संपूर्ण महाराष्ट्रात ज्वारी खरेदीत प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळविला. तब्बल १ लाख ११ हजार क्विंटल ज्वारीची खरेदी करून संघाने प्रथम पारितोषिकही मिळविले. शेतकरी हितासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्यामुळे संघाने सहकार क्षेत्रात आपली स्वतंत्र व भक्कम ओळख निर्माण केली आहे. आधुनिक सुविधांमुळे शेतकरी-व्यापाऱ्यांना मोठा लाभ आजच्या घडीला संघाचे १०८ संस्था सभासद आणि सुमारे ७ हजार ३०६ व्यक्ती सभासद आहेत. हजारो शेतकरी कुटुंबांचा विश्वास संपादन केलेल्या या संस्थेची विकासाची वाटचाल आता अधिक वेगाने आधुनिकतेच्या दिशेने सुरू आहे. नव्या प्रशासकीय इमारतीसह व्यापारी संकुलाच्या उभारणीमुळे पारोळा शहराच्या वैभवात निश्चितच भर पडणार असून, रोजगार व व्यापाराच्या संधींनाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या भूमिपूजन सोहळ्यास संघाचे पदाधिकारी, संचालक मंडळ, सभासद, शेतकरी बांधव, व्यापारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अत्याधुनिक सोयी-सुविधा उभारण्यात येणार

शेतकरी बांधवांना आधुनिक व सक्षम सुविधा उपलब्ध करून देतानाच पारोळा शहराच्या विकासाला नवी दिशा देणारा हा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून साकारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात तीन मजली अत्याधुनिक इमारत, शेतकरी सहकारी संघाची प्रशासकीय कार्यालये, १५० हून अधिक व्यापारी संकुले, शेतकरी निवास आणि विविध अत्याधुनिक सोयी-सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांसाठी हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार असून, पारोळा शहराच्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात या माध्यमातून होणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. १०८ संस्था आणि ७ हजारांहून अधिक व्यक्ती सभासद सन १९१६ मध्ये स्थापन झालेल्या पारोळा तालुका शेतकरी सहकारी संघाला मोठी ऐतिहासिक व गौरवशाली परंपरा लाभली आहे. संघाचे पहिले अध्यक्ष स्व. आण्णासाहेब केशवराव चंदारकर पाटील, तर पहिले उपाध्यक्ष स्व. दादासाहेब बळवंतराव दौलतराव पाटील होते.

# ग. स. बँक निवडणुकीत मतदारांचा उत्स्फूर्त सहभाग!

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी** धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची बँक असलेल्या ग. स. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आज सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली. शहरातील महाराणा प्रताप हायस्कूल येथे सकाळी ८ वाजता मतदान प्रक्रिया सुरू झाली असून, सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. दरम्यान, विरोधकांकडून अल्प उमेदवारी राहिल्याने ही निवडणूक एकतर्फी ठरण्याची शक्यता व्यक्त होत असून, लोकमान्य पॅनलच्या विजयाची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ग. स. बँकेच्या संचालक मंडळातील एकूण १६ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील १३, महिला प्रवर्गातील २ आणि जळगाव सर्वसाधारण प्रवर्गातील १ जागेचा समावेश आहे. लोकमान्य पॅनलच्या विरोधात केवळ तीन उमेदवारांनी उमेदवारी कायम ठेवल्याने निवडणुकीचे चित्र मोठ्या प्रमाणात स्पष्ट झाले आहे. ६ हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी होणाऱ्या पंचवार्षिक निवडणुकीची मतदान प्रक्रिया आज पार पडत आहे. सकाळी ८ वाजता सुरू झालेली मतदान प्रक्रिया दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या निवडणुकीत सुमारे ६ हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. लोकमान्य पॅनलच्या पदाधिकाऱ्यांचा दांडगा जनसंपर्क, निवडणूक प्रचारातील सक्रियता, मतदारांशी सातत्याने साधलेला संपर्क आणि बँकेच्या कारभारातील स्वच्छ प्रतिमा या बाबी पॅनलच्या बाजूने जात असल्याचे समर्थकांकडून सांगण्यात येत आहे. त्यातच विरोधी गटाकडून तुलनेने कमी उमेदवार मैदानात असल्याने लोकमान्य पॅनलचे पारडे जड असल्याचे चित्र मतदानाच्या दिवशी दिसून आले. उद्या मतमोजणी; निकालाकडे लक्ष आज मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उद्या मतमोजणी होणार आहे. त्यामुळे लोकमान्य पॅनलला मतदारांचा नेमका कौल किती मिळतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# सुवर्णकार समाज व सराफ तर्फे आ. चित्राताई वाघ यांचा सत्कार

## समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा



जन सम्राट टाईम्स

**साक्री| प्रतिनिधी :** महाराष्ट्र भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा आमदार चित्राताई वाघ यांचे साक्री येथे आगमन झाल्यानिमित्त सुवर्णकार समाज, साक्री आणि सराफ असोसिएशन, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा आत्मीय सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ देऊन चित्राताई वाघ यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष भटूशेठ माणिकशेठ थोरात, उपाध्यक्ष अनिलशेठ विसपुते, सुवर्णकार संघटनेचे दिलीपशेठ विसपुते, वैभवशेठ वानखेडे, योगेशशेठ वानखेडे, दिनेश भामरे यांच्यासह सुवर्णकार समाजातील अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा सत्कार सोहळ्यादरम्यान सुवर्णकार समाजाच्या विविध प्रश्नांवर, समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक उपक्रमांवर तसेच संघटनात्मक एकजुटीच्या विषयावर सकारात्मक वातावरणात चर्चा करण्यात आली. समाजबांधवांनी आपल्या विविध अपेक्षा व प्रश्न मांडले. साक्रीतील सुवर्णकार समाजाने एकजुटीने आयोजित केलेल्या या सत्कार सोहळ्यामुळे समाजातील बंधुभाव, संघटनात्मक ऐक्य आणि सामाजिक सहभागाची भावना अधोरेखित झाली. सामाजिक विकासासाठी एकत्रित काम करण्याचा निर्धार कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित समाजबांधवांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजाची एकजूट अधिक बळकट करून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या आत्मीय सत्कार सोहळ्यामुळे सुवर्णकार समाज आणि सराफ असोसिएशनमधील संघटनात्मक बांधिलकीला नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र यावेळी दिसून आले. महाराष्ट्र भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा आमदार चित्राताई वाघ यांचे साक्री येथे आगमन झाल्यानिमित्त सुवर्णकार समाज, साक्री आणि सराफ असोसिएशन, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा आत्मीय सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ देऊन चित्राताई वाघ यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष भटूशेठ माणिकशेठ थोरात,दिलीपशेठ विसपुते, वैभवशेठ वानखेडे, योगेशशेठ वानखेडे, दिनेश भामरे यांच्यासह सुवर्णकार समाजातील अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा सत्कार सोहळ्यादरम्यान सुवर्णकार समाजाच्या विविध प्रश्नांवर, समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक उपक्रमांवर तसेच संघटनात्मक एकजुटीच्या विषयावर सकारात्मक वातावरणात चर्चा करण्यात आली.

# दूध संस्थांनी पारदर्शक व सेवाभावी पद्धतीने काम करावे!

## शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य द्या; आ अमोलदादा पाटील यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स




**पारोळा । प्रतिनिधी:** "दूध उत्पादक शेतकरी हा संपूर्ण दुग्ध व्यवसायाचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्या हितासाठी प्राथमिक दूध संस्थांपासून ते दूध संघापर्यंतची संपूर्ण व्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि सेवाभावी पद्धतीने कार्यरत होणे गरजेचे आहे," असे प्रतिपादन एरंडोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांनी केले. जळगाव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, जळगाव यांच्या वतीने पारोळा शहरातील पंकज बँक्वेट हॉल येथे पारोळा, अमळनेर व भडगाव तालुक्यातील प्राथमिक दूध संस्थांच्या चेअरमन व संचालकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. जिल्ह्यातील प्राथमिक दूध उत्पादक संस्थांच्या माध्यमातून दूध संकलन व्यवस्था अधिक सक्षम करणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, दूध संकलनात वाढ करणे तसेच जळगाव जिल्हा दूध संघाशी संबंधित विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करून प्रभावी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शेतकरी आणि दूध संघामधील महत्त्वाची कडी मार्गदर्शन करताना आमदार ॲड. अमोलदादा पाटील म्हणाले की, प्राथमिक दूध संस्था ही दूध उत्पादक शेतकरी आणि दूध संघ यांच्यातील महत्त्वाची कडी आहे. ही कडी अधिक मजबूत झाली, तर त्याचा थेट फायदा दूध उत्पादक शेतकऱ्यांना होईल. "प्रत्येक दूध संस्थेच्या चेअरमन व संचालक मंडळाने संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता, शिस्त आणि कार्यक्षमता यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर दूध संकलन वाढीसाठी सातत्याने प्रयत्न झाले पाहिजेत," असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण अर्थव्यवस्थेला दुग्ध व्यवसायाचा आधार ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात दुग्ध व्यवसायाची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगून आमदार पाटील म्हणाले की, अनेक शेतकरी शेतीसोबतच दूध व्यवसायावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यामुळे दूध उत्पादकांना योग्य दर, वेळेवर पेमेंट, आवश्यक सुविधा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. दूध संकलनाची गुणवत्ता वाढविणे,संस्थांचे कामकाज गतिमान करणे, दूध उत्पादकांची संख्या व दूध संकलन वाढविणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# साळशिंगी शिवारात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला

## ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान, मृत्यूचे कारण अस्पष्ट

जन सम्राट टाईम्स

**बोदवड,। (प्रतिनिधी):** साळशिंगी शिवारात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत एका अनोळखी तरुणाचा कुजलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना शनिवारी उघडकीस आली. मृतदेह काही दिवसांपासून तेथे असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, तरुणाची अद्याप ओळख पटलेली नाही. साळशिंगी शिवारातील एका शेत परिसरात झाडाला तरुणाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत नागरिकांच्या निदर्शनास आला. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याचा मृत्यू काही दिवसांपूर्वी झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच बोदवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून, पुढील कार्यवाहीसाठी तो पाठविण्यात आला आहे. मृत तरुणाची ओळख पटविण्याचे काम



पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, हा तरुण कोण आहे आणि त्याच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, याबाबत परिसरात विविध चर्चा सुरू आहेत. मात्र, पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मृत तरुणाची ओळख पटविण्याचे आवाहन मृत तरुणाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून परिसरातील नागरिकांकडून माहिती घेतली जात आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तत्काळ बोदवड पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे साळशिंगीसह संपूर्ण बोदवड तालुक्यात चर्चेला उधाण आले असून, पोलिस तपासाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. लुक्यातील साळशिंगी शिवारात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत एका अनोळखी तरुणाचा कुजलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना शनिवारी उघडकीस आली. मृतदेह काही दिवसांपासून तेथे असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, तरुणाची अद्याप ओळख पटलेली नाही. साळशिंगी शिवारातील एका शेत परिसरात झाडाला तरुणाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत नागरिकांच्या निदर्शनास आला. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याचा मृत्यू काही दिवसांपूर्वी झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती परिसरात पसरताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच बोदवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून, पुढील कार्यवाहीसाठी तो पाठविण्यात आला आहे. मृत तरुणाची ओळख पटविण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, हा तरुण कोण आहे आणि त्याच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, याबाबत परिसरात विविध चर्चा सुरू आहेत.

# स्कूल ऑफ स्कॉलर्स, मलकापूरमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात!

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर । प्रतिनिधी:** भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त स्कूल ऑफ स्कॉलर्स, मलकापूर येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. क्रीडा संस्कार, शिस्त, संघभावना आणि निरोगी जीवनशैली यांचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या या कार्यक्रमात विविध उपक्रमांसह राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्या डॉ. सौ. सुदीप्ता सरकार, शैक्षणिक समन्वयक श्री. अविनाश ढाके, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. शशांक चौहान, सौ. पल्लवी अहिर, प्री-प्रायमरी विभाग प्रमुख सौ. सुजाता पाटील, सौ. रूपाली पाटील, प्रार्थना प्रमुख श्री. गणेश तायडे, श्री. नितीन तायडे तसेच लेखा विभाग प्रमुख श्री. आकाश खोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विद्येची आराध्य देवता माता सरस्वतीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात



आले. स्टुडंट कौन्सिलच्या विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. खेळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया प्राचार्या डॉ. सौ. सुदीप्ता सरकार यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची माहिती देताना विद्यार्थ्यांच्या जीवनातील खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल साळुंके यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात होणारे सकारात्मक बदल तसेच उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी पालकांचे सहकार्य किती महत्त्वाचे आहे, याबाबत मार्गदर्शन केले. शाळेचे संचालक ॲड. श्री. अमरकुमारजी संचेती यांनी क्रीडा विभागाला राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. क्रीडा विभागाच्या शिक्षिका साक्षी धारस्कर यांनी खेळाडू व प्रशिक्षक यांचे जीवनातील महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तीन भाषांतून मेजर ध्यानचंद यांच्या कार्याला उजाळा कार्यक्रमात इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कु. शनाया पारख हिने इंग्रजी भाषेत मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. कु. स्वरा देशमुख हिने मराठीतून त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व विशद केले, तर कु. अनया पारख हिने हिंदी भाषेत त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाची माहिती दिली. राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव दिल्ली येथे झालेल्या SGFIच्या ६९व्या स्कूल नॅशनल बेसबॉल क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेली शाळेची राष्ट्रीय खेळाडू कु. लावण्या ज्ञानेश्वर बडगुजर तसेच ओडिशा येथे झालेल्या राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेली कु. आरोही देविदास दरेगावे या दोन्ही राष्ट्रीय खेळाडूंचा प्राचार्या डॉ. सौ. सुदीप्ता सरकार यांच्या हस्ते ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# 16.40 मीटर उंच इमारतीला 'हायराईज परवानगी'शिवाय वीज जोडणी?

## माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनंतर चौकशीची मागणी, कारवाईची नागरिकांची मागणी

जन सम्राट टाईम्स




**भुसावळ। प्रतिनिधी:** भुसावळ शहरातील महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे एक प्रकरण समोर आले आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत प्राप्त झालेल्या माहितीनुसार, मौजे भुसावळ येथील सर्व्हे नं. ११५/१३अ, प्लॉट क्र. ०९ वरील 'माऊली प्लाझा' या इमारतीची उंची १६.४० मीटर असल्याचे मोजमाप अहवालात नमूद आहे. मात्र, संबंधित इमारतीला वीज जोडणी देताना आवश्यक 'हायराईज हाइट परमिशन/सर्टिफिकेट'ची पडताळणी करण्यात आली होती का, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाच्या मोजमाप अहवालात सदर इमारतीची उंची १६.४० मीटर असल्याचे स्पष्टपणे नमूद असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे १५ मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींसाठी लागू असलेल्या संबंधित परवानग्या व सुरक्षा निकषांची महावितरणकडून पूर्तता तपासण्यात आली होती का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. माहिती अधिकारातून प्रकरण उघडकीस माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांमुळे या प्रकरणाला तोंड फुटल्याचे सांगण्यात येत आहे. इमारतीची उंची १५ मीटरपेक्षा अधिक असताना वीज जोडणी देण्यापूर्वी आवश्यक परवानग्या तपासण्यात आल्या नसतील, तर ही गंभीर प्रशासकीय त्रुटी ठरू शकते. त्यामुळे संबंधित कागदपत्रांची आणि वीज जोडणी प्रक्रियेची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात संबंधित अधिकारी किंवा ठेकेदारांची कोणतीही अनियमितता अथवा आर्थिक संगनमत असल्याचे अद्याप अधिकृतरीत्या सिद्ध झालेले नाही. मात्र, नागरिकांकडून अशा प्रकारचे आरोप केले जात असल्याने संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. दोषींवर कठोर कारवाईची मागणी या प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या महावितरणच्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित ठेकेदारावरही कारवाई करून त्याची भूमिका तपासावी, तसेच बांधकाम व्यावसायिकाची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आहे. याशिवाय, सदर इमारतीतील रहिवासी व दुकानदारांच्या वीज जोडण्यांची तांत्रिक तपासणी करून आवश्यक त्रुटी व अनियमितता तातडीने दूर कराव्यात, अशी मागणीही पुढे आली आहे. चौकशी न झाल्यास आंदोलनाचा इशारा या गंभीर प्रकरणाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी केली नाही, तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. गांधीगिरीच्या मार्गाने महावितरण कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याची भूमिकाही संबंधितांकडून व्यक्त करण्यात आली आहे. आता महावितरण प्रशासन या प्रकरणातील कागदपत्रांची कशी पडताळणी करते, संबंधित वीज जोडणी कोणत्या प्रक्रियेतून देण्यात आली होती आणि आवश्यक परवानग्यांची पूर्तता झाली होती .

# 270 लोकांना घेऊन जाणारी बोट अचानक उलटली

जन सम्राट टाईम्स

**गंगाखेड | प्रतिनिधी :** आज दुपारी उत्तर सायप्रसच्या किनाऱ्याजवळ धक्कादायक घटना घडली आहे. किनाऱ्यावरुन निघाल्यानंतर थोड्याच वेळात 270 लोकांना घेऊन जाणारी एक प्रवासी फेरी बोट उलटली आहे. तुर्की सायप्रसच्या माध्यमांचा हवाला देत ही बातमी देण्यात आली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, यात जीवितहानी झाली आहे की नाही याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही.

परंतू, बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.कॅटामरान-शैलीची फेरी सायप्रसच्या वांशिकदृष्ट्या विभागलेल्या उत्तर भागात असलेल्या किरेनिया बंदरातून, मेर्सिन प्रांतातील ताशुकचू या तुर्की बंदराकडे प्रवास करत होती. यावेळी किनाऱ्यापासून बोट सुमारे चार मैल अंतरावर गेल्यावर पाणी भरु लागले. त्यानंतर बोट उलटली आहे. घटनास्थळी रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आहेत. तात्काळ बचावकार्य देखील सुरु करण्यात आलं आहे. तुर्कीच्या उत्तर सायप्रसच्या आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, आरोग्य सेवांकडून जलद प्रतिसादासाठी सर्व आवश्यक तयारी केली जात आहे. दपम्यान, उत्तर सायप्रसचे परिवहन मंत्री एर्हान अरिकली यांनी दिलेल्या माहितीनुसार, जहाज उलटल्याची घटना घडली आहे. यानंतर बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. आतापर्यंत 100 हून अधिक लोकांना वाचवण्यात यश आल्याची माहिती त्यांनी दिली आहे. किरेनिया येथे आणण्यात आले आहे. बचावकार्य सुरू आहे. किरेनिया आणि तासुकू दरम्यानच्या व्यस्त मार्गावर अनेक कंपन्या फेरी चालवतात. उलटलेली फेरी कोणत्या कंपनीच्या मालकीची होती हे अद्याप कळलेले नाही.

## टेक्नॉलॉजी



# पहिला रोबो मोबाइल

जपानमधील एका कंपनीने जगातील पहिला रोबोटिक मोबाईल फोन 'रोबोहोन' तयार केला आहे. पॉकेटच्या आकाराचा रोबो मोबाईल हा फोनप्रमाणे काम करण्याबरोबरच वॉकिंग आणि डान्सिंगही करेल. या रोबो मोबाईलची विक्री जपानमध्ये सुरू झाली आहे..मानवी आकाराचे या स्मार्टफोनला जपानची इलेक्ट्रॉनिक कंपनी शार्प आणि इंजिनिअर तोमोताका ताकाहाशीने विकसित केला आहे. ताकाहाशीनेच अंतराळवीर किरोबोची निर्मिती केली होती. एइफईच्या वृत्तानुसार, रोबोहोनची विक्री सुरू झाली आहे. त्याची किंमत बाजारात १८०० डॉलर (सुमारे १ लाख २० हजार रुपये) इतकी आहे.


सध्या कंपनी दर महिन्याला पाच हजार मोबाईल रोबोची निर्मिती करत आहे. या रोबोचा उपयोग मोबाइल फोनबरोबरच प्रोजेक्टर म्हणूनही करता येऊ शकतो. रोबो मोबाईलच्या माध्यमातून व्हिडिओ,फोटो, नकाशा देऊ शकतात. त्याची लांबी १९.५ सेमी असून वजन ३९० ग्रॅम आहे. रोबोहोनमध्ये अनेक वैशिष्ट्ये आहेत. फ्रंट कॅमेऱ्याच्या मदतीने लोकांचा चेहरा ओळखून तो त्यांना नावानेही हाक मारू शकतो.



# नाविन्यपूर्ण गॅझेट

सॅमसंगने भारतीय बाजारात नेहमीच नाविन्यपूर्ण गॅझेट आणले आहे. यंदा सॅमसंगने भारतीय ग्राहकांसाठी एक नवीन टॅब सादर केला आहे. त्याच नाव आहे गॅलेक्सी टॅब आयरिस. या टॅबमध्ये असलेले सेंसर हे या टॅबचे खास वैशिष्ट्य आहे. हे सेंसर आपल्या डोळ्यातील बुबुळाला ओळखते.

या डिव्हाईसला कार्पोरेट आणि सरकारने विकत घ्यावे, असा सॅमसंगचा प्रयत्न आहे. या टॅबची किंमत सुमारे १३,४९९ रुपये आहे. त्याचा स्क्रिन सात इंज असून त्याचे क्वाडकोअर प्रोसेसर १.२ गिगाहट्‌जचे आहे. आठ जिबीची इंटरनल मेमरी आहे असून ती २०० जिबीपर्यंत मायक्रो एसडीकार्डच्या माध्यमातून वाढवता येते. १.५ जिबी रॅम असून त्याचबरोबर ३६०० एमएएचची बॅटरी दिली आहे. पाच मेगामिक्सलचा रिअर कॅमेराही दिला आहे. सॅमसंग भारत कंपनीचे उपाध्यक्ष सुकेश जैन म्हणतात की, टॅबचा वापर आधार कार्ड तयार करणाऱ्या व्हेरिफिकेशन एजन्सीपण करू शकतात. सॅमसंगने यावेळी वैशिष्ट्यपूर्ण टॅब सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. या टॅबमध्ये देण्यात आलेल्या सुविधा लोकांना पसंत पडू शकतात.




# अशा पद्धतीने मिळवा डेटा

डेटा मिळवण्यासाठी आपल्याला अगोदेर गूगल प्ले स्टोअरवर जावे लागेल आणि पँडोरा रिकव्हरी सॉफ्टवेअर डाऊनलोड करावा लागेल. पँडोरा डाऊनलोड झाल्यानंतर हे सॉफ्टवेअर आपल्याला ओपन करावे लागेल. जी विंडो आपल्यासमोर दिसत आहे, त्यात आपण खाली दिलेल्या नेक्स्ट ऑप्शनवर टॅब करावे लागेल. क्लिक करताच आपल्यासमोर आलेल्या अटी आणि शर्तीची विंडो ओपन होईल. त्यानंतर पुन्हा एकदा नेक्स्टचा पर्याय निवडा. आता पँडोरा ॲपला कोणत्या फोल्डरमध्ये इंस्टॉल करावयाचे याची विचारणा होईल. त्यानुसार फोल्डर निवडून हे सॉफ्टवेअर इन्स्टॉल करा. आपला पेनड्राईव्ह संगणक किंवा लॅपटॉपला कनेक्ट करा.

आपल्या सिस्टिम्समध्ये दिसणाऱ्या पँडोरा रिकव्हरी सॉफ्टवेअर आयकॉनवर क्लिक करा. आता आपल्याला पेनड्राइव्हचा ऑप्शन दिसू लागेल. त्याला टॅब केल्यानंतर आपण पुन्हा रिकव्हरीचा ऑप्शन निवडा. क्लिक करताच आपल्याला पेनड्राईव्हमधून डिलीट झालेल्या फाइल्स दिसू लागतील. या फाइलला राईट क्लिक करा आणि रिकव्हरी करा. आपल्याला ज्या फोल्डरमध्य या फाईलला सेव्ह करायचे आहे तेथे या फाईल्स सेव्ह करता येतील. काही मिनिटातच आपल्या पेनड्राईव्हमधील सगळा डेटा सेव्ह होईल

## वाढवा जीके

१.जगात सर्वाधिक पाऊस कुठे पडतो? २. जगातील सर्वाधिक थंड ठिकाण कोणते? ३. पृथ्वीवरील सर्वात कोरडे ठिकाण कोणते? ४. आतापर्यंत सर्वाधिक तापमानाची नोंद कुठे झाली? ५. सर्वांत मोठी लाट जिथे आल्याची नोंद झाली आहे ते ठिकाण कोणते?

**उत्तर : १. चेरापुंजी, २. अंटर्क्टिका, ३. चिलीतील ॲटाकॉमा वाळवंट, ४. लिबियातील एल अझिझिया येथे.५. लिटुया बे, अलास्का**

## मोलाचे विचार

**प्रत्येकावर विश्वास ठेवणे धोकादायक असते. पण कोणावरही विश्वास न ठेवणे हे अतिधोकादायक असते.**
**– अब्राहम लिंकन**



**कॉलेजमध्ये जगण्याची संधी आयुष्यात एकदाच मिळत असते. ही संधी न दवडता त्याचा योग्य विनियोग कसा करता येईल, कॉलेजमधील जीवन अधिकाधिक संस्मरणिय कसे राहिल, याचाच विचार केला पाहिजे. कॉलेजमध्ये शिकत असताना रुम पार्टनर, प्राध्यापक, विद्यार्थी गट, अभ्यासगट, ग्रंथालयातील सोबती याचा दररोज संबंध येतो. आपण त्यांच्याशी कसे वागतो किंवा राहतो यावर आपल्या कॉलेज जीवनातील यशापयश अवलंबून असते. कॉलेज म्हणजे विचारांना स्वातंत्र्य मिळणारी जागा हे जरी खरे असले तरी त्याचा स्वैराचार होऊ नये, यासाठी आपण अधिक सजग राहणे गरजेचे आहे. कॉलेजमध्ये वावरताना संभाव्य चुका टाळल्यास भविष्याची चांगली पायाभरणी कॉलेजमध्ये होऊ शकते.**



# कॉलेजदुशेतील 'डोप्टस'

- सक्रिय न राहणे : महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणारे विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी भितीपोटी महाविद्यालयातील चळवळीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत असतात. कॉलेजमध्ये अनेक उपक्रम राबविण्यात येतात. अशा ठिकाणी आपली सक्रियता, सहभाग वाढविणे गरजेचे आहे. जेणेकरून आपली ओळख वाढेल आणि नवनवीन मित्र-मैत्रिणी जोडले जातील. चार हात लांब राहणारे विद्यार्थी सर्वच उपक्रमापासून वंचित राहतात आणि अनेक संधी गमावून बसतात. त्यामुळे कॉलेजमध्ये गटात, कॅम्पसमध्ये आपली सक्रियता कशी राहिल, याची काळजी घेतली पाहिजे.
- अभ्यासेतर उपक्रमात सहभागी न होणे : महाविद्यालयात विविध विभागामार्फत अभ्यासेतर उपक्रम सुरू असतात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी त्याचे आयोजन करण्यात येते. मात्र काही विद्यार्थी पुस्तकी किडे बनून राहण्याचा प्रयत्न करत असतात. वेळ वाया जातो किंवा त्याचा उपयोग काय असा विचार करून ते अशा उपक्रमात सहभागी होण्यासाठी उत्साह दाखवत नाहीत. अशा विचारसरणीमुळे विद्यार्थी आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत असतो. अभ्यासेतर उपक्रमामुळे आपल्या जगभरात चाललेल्या विविध उपक्रमाची माहिती मिळत असतेच त्याचबरोबर नवीन प्राध्यापक, मार्गदर्शकाचा सहवास लाभत असतो. या माध्यमातून विचारांचे आदानप्रदान होते आणि आपल्या कलागुणांना वाव मिळू शकतो. आपल्याला कोणत्या क्षेत्रात अधिक रुची आहे, ते क्षेत्र निवडल्यास भविष्यात त्याचा फायदा होऊ शकतो. महाविद्यालयाकडून आयोजित केलेले रक्तदान शिबिर, स्वच्छता मोहिम, रस्ते सुरक्षा सप्ताह आदी उपक्रमात सहभाग घेणे गरजेचे आहे.
- चुकीच्या गटात सहभागी होणे : महाविद्यालयात अनेक विचारांचा गट असतो. आपल्या विचारांशी साधर्म्य असणाऱ्या गटात सहभागी होणे हे शहाणपणाचे लक्षण आहे. हॉस्टेलमधील रुममेट शक्यतो आपल्या विचाराशी मिळताजुळता घेणारा असावा. परंतु जर त्याचे पटत नसेल तर आपण नवीन गट किंवा रुममेट शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून आपल्याला मानसिक त्रास होणार नाही. रुमवर टाइमपास करणारे, उथळ विचाराचे मुले टाळले पाहिजेत. यासाठी चांगल्या मुलांचा गट बनविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.
- शिस्तबद्धता नसणे : कॉलेजमध्ये शाळेसारखी शिस्तबद्धता नसली तरी आपण कॉलेज जीवनाचा उपभोग घेताना त्याचा अवलंब करणे आवश्यक आहे. आपले राहणीमान, वर्गातील नियमित उपस्थिती, रुमवरील निटनेटकेपणा याबाबत कटाक्ष असला पाहिजे. अव्यवस्थित किंवा अजागळेपणा आपल्या व्यक्तिमत्त्वावर विपरित परिणाम करू शकतो. प्राध्यापकही बेशिस्त विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे आपण कॉलेजजीवनात वावरताना शाळेइतकी नव्हे परंतु शिस्तबद्ध जीवनशैली बाळगली तर करियरसाठी त्याचा निश्चितच उपयोग होतो. कॅम्पस मुलाखतीसाठी अशा विद्यार्थ्यांची प्राध्यापकही शिफारस करण्यासाठी उत्सुक असतात. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांत आपले 'गुडविल' राहवे यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे.
- प्राध्यापकांचा सल्ला न घेणे : कॉलेजमध्ये गेल्यानंतर काही विद्यार्थ्यांच्या डोक्यात हवा जाते. एखादा प्रश्न किंवा अभ्यासक्रम समजून घेण्यात अडचण आली तर त्याबाबत चौकशी किंवा सल्ला घेण्याचे विद्यार्थी टाळतात. एखादी गोष्ट विचारणे म्हणजे कमीपणाचे लक्षण असल्याचा काही जणांचा भ्रम असतो. परंतु हा दृष्टिकोन चुकीचा आहे. प्राध्यापकांचा सल्ला न घेणे ही गोष्ट आपल्याला भविष्यासाठी अडचणीची ठरू शकते. प्राध्यापक, मित्र यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर अनेक प्रश्न निकाली लागू शकतात आणि आपल्या मनातील शंकेचे निरसन होऊ शकते. अभ्यासगट, कर्मचारीवृंदांशी संवाद साधून आपल्याला वेळोवेळी येणाऱ्या प्रश्नांची उकल करता येऊ शकते.
- वेळेत 'सबमिशन' न करणे : अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेतर अशी अनेक उपक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी कॉलेज आपल्यावर टाकत असते. अशा वेळी आपण तो उपक्रम किंवा अभ्यास वेळेत पूर्ण करून देणे हे योग्य ठरते. काही अडचणींमुळे आपण गैरहजर राहिलो तर त्याची माहिती सहकारी मित्रांकडून घेऊन ते वेळेच्या आतच कसे सादर करता येईल, याकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते. कॉलेजची कामे वेळेत पूर्ण केल्यास आपल्याबद्धलची प्रतिमा उंचावते आणि प्राध्यापक मंडळीत आपल्याबद्धलची विश्वासर्हता उंचावण्यास हातभार लागतो.

# संगीत शिका, स्मार्ट व्हा

***आनंदी आयुष्य जगण्यासाठी संगीताची साथ ही खूप मोलाची ठरते. त्यामुळेच आपल्यातील प्रत्येकाने एखादे तरी वाद्य वाजवायला शिकले पाहिजे. संगीतसाधनेमुळे आयुष्यातील इतर काही गोष्टीतही सुधारणा होण्यास मदत मिळते. संगीतवाद्य शिकण्यामुळे कोणते फायदे होतात हे जाणून घेऊ.***



स्मरणशक्ती वाढते : संगीतवाद्य वाजवण्याचा एक मोठा फायदा आहे हा. संगीत ऐकणे आणि वाद्य वाजवणे ह्या दोन्ही आपल्या मेंदूला उत्तेजित करतात. त्यामुळे संगीत वाद्य शिकण्यासाठी उशीर झालेला नसतो, ते कोणत्याही वयात शिकता येते. वाद्य शिकताना मेंदू कायम सजग आणि कार्यक्षम राहात असल्यामुळे अर्थातच स्मरणशक्ती वाढते.

ताणापासून सुटका : ताणापासून मुक्ती मिळवायची असेल तर नियमितपणे संगीत वाद्य वाजवा. आपल्याला आवडणारे कोणतेही गाणे त्यावर वाजवा. आपण आपले आवडते गाणेही ऐकू शकतो. संगीत हे तणावमुक्तीचे महत्त्वाचे साधन बनू शकते.

समाजसंपर्कात वाढ : संगीतवाद्य शिकल्यामुळे संगीतात अधिक रस निर्माण होतो. पर्यायाने आपण मैफिलींना जातो. लोकांशी संपर्क होतो. आपण वाद्य वाजवत असल्याचे त्यांना कळते. त्यामुळे आपण सगळ्या प्रकारच्या समाजात सहजपणे मिसळू शकतो.

शिस्त लागते : संगीतवाद्य वाढत्या वयात शिकणे तसे अवघडच जाते पण तरीही चिकाटीने ते शिकत रहा. त्याचे अनेक फायदे होतात. मुख्य म्हणजे आपल्याला एक शिस्त लागते. आपण एकूणच व्यवस्थापन शिकतो. कारण चांगला वादक होण्यासाठी शिस्त आणि योग्य व्यवस्थापन शिकावेच लागते. आपल्याला रोजच्या रोज सराव करावा लागतो. गोष्टींचे प्राधान्यक्रम लक्षात येऊ लागतात. त्यामुळे वाद्य शिकण्यासाठी योग्य तेवढा वेळ द्या.

जबाबदार व्यक्ती : कोणतेही वाद्य शिकताना धीर धरणे गरजेचे असते कारण शिकण्यासाठी वेळ हा लागतोच. शिवाय त्याचा जास्तीत जास्त सराव करावा लागतो. वाद्य शिकताना काही अवघड जागा, सुरांचा सराव सातत्याने करावा लागतो. त्यामुळे साहजिकच जबाबदारीची जाणीव आपल्याला होऊ लागते.

गणिती क्षमता : संगीतातही नोटेशन घ्यावे लागते, ताल मोजावा लागतो. त्यामुळे वाद्य शिकताना आपले गणिती ज्ञानही उपयोगी पडणार आहे. संगीताचा शास्त्रीय बैठक किंवा सिद्धांत समजून घेताना बुद्धीचा कस लागतो. संगीत वाद्य शिकणाऱ्या व्यक्ती त्यांच्या अभ्यासातही विशेष चमक दाखवतात, असे आढळून आले आहे. गणितात विशेष प्राविण्य मिळवतात. त्यामुळे इतरांच्या तुलनेत प्राविण्य, पुरस्कार पटकावण्यात संगीत वाद्य शिकणारे विद्यार्थी आघाडीवर असतात.

हेही लक्षात ठेवा : *कोणतेही वाद्य वाजवायला शिकताना आपले हात आणि नजर यांच्या हालचाली जुळायला हव्यात. जेव्हा आपण एखादे वाद्य वाजवतो तेव्हा आपल्या वहीतील नोटेशन वाचून मेंदू त्याचे विविध पॅटर्न्स आतल्या आत बनवत असतो. आपल्याला एक विशिष्ट तालयोजना करायची असते, त्यामुळे आपल्या श्वासावर लक्ष केंद्रीत करा जेणेकरून आपण हे वाद्य अधिक सुरेल वाजवू शकू.*

**पुरुषांना ग्रुमिंगची गरज नसते, असा एक पारंपरिक विचार सामान्यपणे आपल्याकडे दिसून येतो. पुरुषीपणाच्या काही पारंपरिक कल्पनादेखील दिसून येतात. पण असे असले तरीही बदलत्याकाळात पुरुषांचे ग्रुमिंग ही गरजेची गोष्ट बनलेली आहे. जिम इतकेच त्यालाही महत्व आलेले आहे. त्याबाबत वेगवेगळे संशोधन होऊन दैनंदिनीत पुरुषांना कशा प्रकारच्या ग्रुमिंगची गरज आहे, याबाबतचे काही नियमही सांगितले जात आहेत. अशाच प्रकारच्या काही नियमांबाबत जाणून घेऊ.**

# पुरुषांसाठीही ग्रुमिंग आवश्यक



- क्लिनझिंग : क्लिनझिंगमुळे त्वचेवरच्या रंध्रांमधील मृत पेशी निघून जातात. योग्यप्रकारे क्लिनझिंग होण्यासाठी चांगल्या दर्जाचे फेसवॉश घेऊन कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. फेसवॉश नसल्यास दर्जेदार साबण आणि गार पाणी यांचाही वापर करता येतो. पण हा उपाय खुपच मुलभूत असून त्यामुळे त्वचेचे नैसर्गिक संतुलन बिघडू शकते.
- टोन - क्लिनझिंग झाल्यानंतर टोनींग गरजेचे असते. क्लिनझिंगमुळे उघडी झालेली रंध्रे टोनरमुळे पुन्हा बंद होतात आणि त्वचेवर एक प्रकारचा तजेला येतो. तेलकट त्वचेसाठी टोनींग अधिक गरजेचे असते. टोनर वापरताना ते अल्कोहोल फ्री आहे याची खात्री करुन घ्यावी, म्हणजे त्वचेचा नैसर्गिक पोत बिघडणार नाही.
- मॉईश्चराईज - क्लिनझिंग आणि टोनींग केल्यानंतर रिहायड्रेशन गरजेचे असते. मॉईश्चराईज केल्यानंतर त्वच्या त्वरीत मुलायम होते आणि त्वचेतील आद्रर्ता कायम राहण्यासाठी त्याची मदत होते. त्वचा कोरडी असल्यास मॉईश्चरायझिंग करण्यासाठी क्रिम सुध्दा वापरता येऊ शकते. तर नॉर्मल आणि कॉम्बिनेशन त्वचा असल्यास जेलचा वापर करता येते. ज्यांची त्वचा अतिशय संवेदनशिल आहे, अशांनी ऑईल फ्री लोशनचा वापर करावा.
- सेन्ट - सेन्टची निवड सुध्दा ग्रुमिंगसाठी महत्वाची असते. तसेच स्प्रे कशापद्धतीने वापरावा हे देखील महत्वाचे असते. त्यामुळे सेन्ट नेहमी लाईट असावा तो खुप जास्त वापरु नये. आपल्या प्रवेशापुर्वीच सेन्टचा सुगंध पोहचेल एवढ्या प्रमाणात तो वापरु नये. त्यासाठी हाताच्या मनगटावर गळ्याच्या मागच्या बाजुला मानेवर स्प्रे वापरावे. त्वचा संवेदनशील असेल तर कपड्यांवर सेन्ट लावावा. एवढी काळजी घेतली म्हणजे व्यक्ती महत्वाचा भडकपणा जाणवणार नाही.



# महाविद्यालयात जाताना...

***महाविद्यालयात प्रवेश करण्यापूर्वी आपल्याला त्यातून बऱ्याच गोष्टी गवसत असतात. ही मजा जितकी महत्त्वाची तितकेच आपल्या शिक्षणाकडे, पुढच्या व्यावसायिक कारकीर्दीकडे लक्ष देणे आणि त्यासाठी महाविद्यालयीन प्रवेशासाठीची तयारी करणे महत्त्वाचे असते. त्यासाठी काही टिप्स***

**सामील व्हा :** विविध संघटना, गट यांच्यात सामील व्हा. नेतृत्त्व संघ, क्रीडा संघ, सकारात्मक मित्रांचा संघ आणि इतर कृतीकार्यक्रमात सहभागी व्हा. त्यामुळे एकटे न पडता नव्या लोकांमध्ये मिसळण्याची सवय होण्यासाठी हा उत्तम मार्ग आहे.

**वाचन वाढवा :** आपण शिकणाऱ्या विषय कोणताही असो आपले वाचन वाढवा. नियमितपणे वाचनाची सवय लावा. आपल्या अभ्यासासाठीच्या वाचनाव्यतिरिक्त पुस्तके वाचा, त्यामुळे समान आवडीची पुस्तके वाचणाऱ्या इतर लोकांशी आपण जोडले जातो.

**घोकंपट्टीची सवय :** शाळेत परीक्षा आली की घोकंपट्टी करण्याची सवय आपल्याला लागलेली असते. महाविद्यालयात सातत्याने परीक्षा घेतल्या जातात. हीच सवय आपण महाविद्यालयीन परीक्षेसाठीही वापरतो. पण ती बदलायला हवी. महाविद्यालयीन जीवनात गेल्यानंतर सुरुवातीपासूनच अभ्यासाची तयारी करायला लागा. रोज एक तास नेमाने अभ्यास करण्याची सवय परीक्षेच्या आठवडाभर आधीपासून स्वतःला लावली तर कॉलेजजीवनात यश मिळवणे कठीण जाणार नाही.

**सामाजिक कौशल्ये वाढवा :** संवादकौशल्य वाढवण्यासाठी महाविद्यालयात कायमच पाठिंबा मिळतो. त्याचा उपयोग आपल्याला समूह प्रकल्पात, प्राध्यापकांशी संवाद साधाताना इतकेच काय पुढे जाऊन नोकरीत मालकाशी बोलताना देखील होतो.

## दोस्ती इंग्रजीशी

रलॉीी : अर्थ : या बाजूकडून त्या बाजूकडे. समोरच्या बाजूला. पलीकडच्या बाजूला
ड्हश ेंझ ेिंहश श्रळीींश्रश लू रलॉीी ेिंहश ीेरव
त्या छोट्या मुलाला ती रस्त्याच्या पलीकडच्या बाजूला घेऊन गेली.

सरीश्ररपव : अर्थ : पाने, फुले अशा गोष्टींचा हार. पानाफुलांचे चक्र.
डोशेपश हरव ििीं र श्रींशश्रू सरीश्ररपव`प ेिंहश डींीिंश.
पुतळ्याला कोणीतरी सुंदर हार घातला होता.

## हसरा कोपरा



चिंटू 'मुलांचं पालनपोषण' नावाचं एक पुस्तक वाचण्यात अतिशय मग्न होता. ते पाहून आई जवळ आली आणि चिंटूला विचारले , चिंटू बेटा हे पुस्तक तू इतके मन लावून का वाचत आहेस? चिंटू म्हणाला, मुलांचं पालनपोषण असं पुस्तक आहे. मी हे पहात आहे की माझे पालनपोषण योग्यरीत्या होत आहे की नाही.